**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-**
४४०००१. e-mail:- msboardnagpur@gmail.com
www.nagpureduboard.in

पत्र क्र/नाविमं/ गो.संकिर्ण /258
नागपूर दि:-18/01/२०२५

**प्रति,**

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक व उच्च
माध्यमिक विद्यालये,
नागपूर विभाग,
नागपूर.

**विषय** :-उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०) वी फेब्रुवारी/मार्च-२०२५ च्या परीक्षेकरिता कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत जनजागृती सप्ताह आयोजित करणेबाबत...
**संदर्भ** :-क्र.रा.मं.परीक्षा-५/२०१ पुणे दि.१७ जानेवारी २०२५.

उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०) वी फेब्रुवारी/मार्च-२०२५ च्या परीक्षेकरिता सोमवार दिनांक २० जानेवारी २०२५ ते रविवार २६ जानेवारी २०२५ या कालावधीत कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत जनजागृत सप्ताह आयोजित करून सोबत जोडण्यात आलेल्या तपशीलानुसार आयोजन करावे.

**सोबत** :- कॉपीमुक्त अभियान जनजागृत सप्ताह तपशील.

( चिंतामण वंजारी )
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रत :-

1.**मा.सचिव,**महाराष्ट् राज्य मा. व उ. मा. शिक्षण मंडळ,पुणे
2.विभागीय शिक्षण उपसंचालक,नागपूर विभाग,नागपूर
3.शिक्षणाधिकारी,(प्रा / मा / यो)जिल्हा परिषद कार्यालय,नागपूर/भंडारा/गोंदिया/चंद्रपूर/वर्धा/ गडचिरोली.

1/2

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा

फेब्रुवारी–मार्च २०२५

!! कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत जनजागृती सप्ताह !!

(कालावधी–सोमवार दिनांक २० जानेवारी २०२५ ते रविवार २६ जानेवारी २०२५)

| अ.क्र. | दिनांक | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| १ | सोमवार<br>दि. २०/०१/२०२५ | स्थानिक लोकप्रतिनिधी, शाळा विकास व व्यवस्थापन समिती सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक व प्राचार्य, शिक्षक यांना संयुक्त सभेमध्ये कॉपीमुक्त अभियानाची शाळा पातळीवर अंमलबजावणी करणेबाबत प्राचार्य व मुख्याध्यापक यांनी माहिती देणे. |
| २ | मंगळवार<br>दि. २१/०१/२०२५ | कॉपीमुक्त अभियानाची शपथ सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये परिपाठाचे वेळी घेणे. (सोबत शपथेचा नमूना जोडला आहे.) |
| ३ | बुधवार<br>दि. २२/०१/२०२५ | शाळा स्तरावर मंडळ शिक्षासूचीचे वाचन करणे, मंडळाच्या उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठाच्या मागील बाजूस असलेल्या सूचना, व प्रवेश पत्रावरील (Hall Ticket) सूचनांचे वाचन करणे. गैरमार्ग केल्यास होणाऱ्या परिणामांची जाणीव करून देणे. |
| ४ | गुरूवार<br>दि. २३/०१/२०२५ | परीक्षा काळात विद्यार्थ्यांनी घ्यावयाचा आहार व आरोग्याची काळजी याबाबत तज्ज्ञांमार्फत शाळा/कनिष्ठ महाविद्यालयमध्ये पालक व विद्यार्थ्यांना उद्‌बोधन करणे. |
| ५ | शुक्रवार<br>दि. २४/०१/२०२५ | परीक्षेला सामोरे जाताना अभ्यासाची तयारी, परीक्षा तणावमुक्त वातावरणात कशी देता येईल, उत्तरपत्रिका कशा प्रकारे लिहाव्यात याबाबत तज्ज्ञांमार्फत मार्गदर्शन करणे. तसेच राज्य मंडळामार्फत तयार केलेली चित्रफीत विद्यार्थ्यांना दाखविणे |
| ६ | शनिवार<br>दि. २५/०१/२०२५ | कॉपीमुक्त अभियानाच्या जागृतीसाठी कॉपीमुक्ती घोषवाक्यासह शाळा परिसरात जनजागृती फेरी काढणे. |
| ७ | रविवार<br>दि. २६/०१/२०२५ | ग्रामसभा बैठकीमध्ये मुख्याध्यापक/शिक्षक यांनी कॉपीमुक्त अभियानासंदर्भात वरील विषयांबाबत माहिती देणे व याबाबत जनजागृती करणे व कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडण्यासाठी ग्रामस्थांना आवाहन करणे. |

(देविदास कुलाळ)
सचिव
राज्य मंडळ, पुणे–०४.

2/2

## !! शपथ !!

मी शपथ घेतो की, मी फेब्रुवारी–मार्च २०२५ च्या इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेस परिपूर्ण अभ्यास करूनच सामोरे जाईन. मी उत्तीर्ण होण्यासाठी परीक्षेत कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करणार नाही किंवा परीक्षेपूर्वी गैरमार्गाचा विचारही करणार नाही.

जर कोणी गैरमार्गाचा विचार करत असेल तर त्यास गैरमार्गापासून परावृत्त करेन. परीक्षेला सामोरे जाताना मंडळ सूचनांचे व नियमांचे काटेकोरपणे पालन करेन. मी सातत्याने अभ्यास करेन व प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव करेन. तसेच परीक्षेस आत्मविश्वासाने, निर्भिडपणे, तणावविरहित सामोरे जाईन व चांगल्या गुणाने उत्तीर्ण होऊन माझ्या शाळेचे, आई वडीलांचे व गुरूजनांचे नाव उज्ज्वल करेन.

**जय हिंद–जय महाराष्ट्र**